# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 18 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १८ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्ड वितरणाला आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ झाला आहे. या कार्यक्रमात देशातल्या दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतल्या ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् पंतप्रधानांच्या हस्ते वितरित होत आहे, दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात तसंच प्रत्येक तालुका मुख्यालयात हा कार्यक्रम पाहण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. पंतप्रधान सध्या या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांशी संवाद साधत आहेत.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जांची आज छाननी होणार असून सोमवारपर्यंत नावे मागे घेता येतील. ७० सदस्यांच्या विधानसभेसाठी एकूण एक हजार पाचशे एकवीस उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, काल उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ६८० उमेदवारी अर्ज दाखल झाले. येत्या ५ फेब्रुवारी रोजी ७० जागांसाठी एकाच टप्प्यामध्ये मतदान होणार आहे, तर ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

****

दर्जेदार आणि चांगल्या आरोग्य सेवांसाठी तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित दोन दिवसीय 'पॅन आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी-२०२५' या परिषदेच्या उद्घघाटन सत्रात आज ते बोलत होते.

तंत्रज्ञानाचा विकास आणि वापरामुळे आरोग्य क्षेत्रात विशेषतः ग्रामीण भागातील आरोग्य क्षेत्रात क्रांती घडणार आहे. ग्रामीण आणि सुदूर भागात जिथं डॉक्टरांना पोहचणं शक्य होत नाही, अशा ठिकाणचे रुग्ण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या डॉक्टरांपर्यंत पोहचू शकणार आहेत असं त्यांनी सांगितलं.

****

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरुद्ध अंमलबजावणी संचालनालय ईडीने मोठी कारवाई केली आहे. ईडीच्या चौकशीत मुख्यमंत्र्यांशी संबंधित मोठा भ्रष्टाचार उघडकीस आल्याचं कर्नाटक भाजपचे प्रदेशाध्यक्ष बी.वाय. विजयेंद्र यांनी म्हटलं आहे. राज्यपालांच्या संवैधानिक अधिकारांना कमकुवत केल्याबद्दल विजयेंद्र यांनी काँग्रेसवरही टीका केली.

राजकीय बळाचा वापर करून स्वःतच्या पत्नीच्या नावावर बेकायदेशीरपणे जागा वाटप केल्याचा आरोप सिद्धरामय्या यांच्यावर आहे. या प्रकरणी ईडीने त्यांच्यासह इतरांची ३०० कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता जप्त केली आहे.

****

मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर व्यक्तीगत वैमनस्यातून आरोप होत असून या आरोपांत पोलिस तपासात

थोडंही तथ्य आढळलं तर पक्ष त्याबाबत कारवाई करेल, असं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिवेशन आज अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शिर्डी इथं होत आहे. प्रफुल्ल पटेल यांनी साईबाबांच्या मंदिरात दर्शन घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना ही बाब स्पष्ट केली.

मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांबाबत पोलिस यंत्रणा तपास करत आहेत. या गुन्हाबाबत कोणाचीही गय केली जाणार नाही, असं मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्पष्ट केलं आहे, त्यामुळं वैयक्तिक वैमनस्य बाळगून केलेल्या आरोपांवरुन मंत्री मुंडे राजीनामा घ्यायचा का? असा सवाल ही त्यांनी यावेळी केला.

****

कोल्हापूर मधल्या श्री अंबाबाई मंदिर परिसरातील कामं जलद गतीनं पूर्ण करावीत तसंच या कामांच्या दर्जात कोणतीही हयगय होता कामा नये, असे निर्देश कोल्हापूरचे जिल्हाधिकारी तथा पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल येडगे यांनी दिले आहेत. अंबाबाई मंदिर परिसरातील नूतनीकरण कामांबाबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असणाऱ्या श्री अंबाबाई मंदिरात दर्शनासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविक येतात. मंदिर परिसरात काम सुरू असल्यामुळं दर्शन व्यवस्थेत अडथळा येऊ नये, यासाठी खबरदारी घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

***

भंडारा जिल्हाच्या लाखनी तालुक्यातील खुटसावरी इथं एका खाजगी कंपनीच्या दुध वाहतूक करणाऱ्या टेम्पो वाहनातून अवैधरित्या नेण्यात येणारी दोन लाख ९५ हजार रुपयांची सुगंधी तंबाखू पोलिसांनी आज जप्त केली याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली आहे.

****

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आयसीसीतर्फे १९ वर्षाखालील महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा आजपासून मलेशियात सुरू होत आहे. ही स्पर्धा १५ दिवस चालणार असून त्यात १६ संघ सहभागी होत आहेत. या संघांना चार गटात स्थान देण्यात आलं आहे. गट अ मध्ये भारताचा पहिला सामना उद्या वेस्ट इंडिजविरुद्ध होईल, तर उपांत्य फेरीचे सामने ३१ जानेवारी रोजी खेळवले जातील.

****